महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा 2022
कर सहायक - (स्वतंत्र पेपर-क्रमांक-2)

2022

जाहिरात क्रमांक ११५/2022
परीक्षा दि. 08/03/2023

D17

संच क्र. **A**

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 306385

# प्रश्नपुस्तिका – II
# सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे/विषयासंबंधीचे ज्ञान

एकूण प्रश्न : 100

**वेळ : 1 (एक) तास** **एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**1. खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्ये आहेत ?**

i. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे

ii. भारताच्या सार्वभौमत्व, अखंडतेचे आणि ऐक्याचे रक्षण करणे

iii. वैज्ञानिक स्वभाव व मानवतावाद विकसित करणे

(1) i आणि ii (2) ii आणि iii (3) iii आणि i (4) i, ii आणि iii

Which of the following are Fundamental Duties ?

i. Safeguarding Public Property

ii. Protecting the Sovereignty, Integrity and Unity of India

iii. Developing scientific temper and humanism

(1) i and ii (2) ii and iii (3) iii and i (4) i, ii and iii

---

**2.** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्मितीस कारणीभूत ठरलेल्या दोन घटनादुरुस्त्या कोणत्या ?

(1) 73 व 74 वी दुरुस्ती (2) 71 व 72 वी दुरुस्ती

(3) 77 व 78 वी दुरुस्ती (4) यापैकी कोणत्याही नाहीत

Which two Amendments were responsible for the formation of the Maharashtra State Election Commission ?

(1) $73^{rd}$ and $74^{th}$ Amendment (2) $71^{st}$ and $72^{nd}$ Amendment

(3) $77^{th}$ and $78^{th}$ Amendment (4) None of these

---

**3.** भारतीय संघवाद _______ संघवादाशी मिळता-जुळता आहे.

(1) नाईजीरियाचे

(2) आस्ट्रेलियाचे

(3) कॅनेडाचे

(4) संयुक्त राज्य अमेरिकाचे

Indian Federalism is similar to ________ federalism.

(1) Nigerian

(2) Australian

(3) Canadian

(4) United States of American

4. 73 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1992 शी संबंधित पुढील विधानावर विचार करा :

A. ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मिळून बनलेली त्रिस्तरीय रचना.
B. ग्राम स्तरावर ग्रामसभा स्थापन करणे.
C. महिलांसाठी एक–तृतीयांश जागांचे आरक्षण.
D. दर 3 वर्षांनी पंचायतीची नियमित निवडणूक.

(1) सर्व विधाने योग्य आहेत.
(2) विधान A आणि C बरोबर आहे आणि विधान B व D चुकीचे आहे.
(3) केवळ A, B आणि C ही विधाने योग्य आहेत.
(4) सर्व विधाने चुकीचे आहेत.

Consider the following statements regarding the 73rd Constitutional Amendment Act, 1992 :

A. 3 tier structures which include the Gram Panchayat, Panchayat Samiti, Zilha Parishad.
B. To establish Gram Sabha at village level.
C. Reservation of one-third seats for women.
D. Regular elections of Panchayats in every 3 years.

(1) All statements are true
(2) Statements A and C are true, B and D are false
(3) Only statements A, B and C are true
(4) All statements are false

---

5. राज्याच्या महाधिवक्ता संबंधी खालील विधानांपैकी योग्य विधाने पुढील पर्यायातून निवडा.

अ. राज्यशासनाला कायदेविषयक सल्ला देणे.
ब. राज्य विधिमंडळाच्या कामकाजात भाग घेणे.
क. तो राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पदधारण करतो.
ड. राज्य विधिमंडळात मतदान करणे.

(1) 'अ' आणि 'क' (2) 'ब' आणि 'क' (3) 'ब' आणि 'ड' (4) 'अ' आणि 'ब'

Choose the correct statements related to State Advocate General from below.

a. To give legal advice to the State Government.
b. To take part in the proceedings of the State Legislature.
c. He holds office during the pleasure of the President.
d. To vote in State Legislature.

(1) 'a' and 'c' (2) 'b' and 'c' (3) 'b' and 'd' (4) 'a' and 'b'

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**6.** जिल्हा व सत्र न्यायाधीशांवर कोणाचे नियंत्रण असते ?

(1) राज्याचे राज्यपाल

(2) राज्याचे कायदा मंत्री

(3) राज्याचे उच्च न्यायालय

(4) जिल्हाधिकारी

The District and Sessions judge works directly under the control of

(1) Governor of the State

(2) Law Minister of the State

(3) High Court of the State

(4) District Collector

---

**7.** घटनापरिषदेचे घटनात्मक सल्लागार किंवा कायदेशीर सल्लागार म्हणून खालीलपैकी कोणाची नियुक्ती करण्यात आली होती ?

(1) एन. गोपालस्वामी अय्यंगार (2) सर बी. एन. राव

(3) टी. टी. कृष्णम्माचारी (4) एन. माधवराव

Who was appointed as the constitutional advisor/legal advisor to the Constituent Assembly ?

(1) N. Gopalswamy Ayyangar (2) Sir B. N. Rau

(3) T. T. Krishnamachari (4) N. Madhava Rau

---

**8.** निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने निवडणूकीचा अधिकृत निकाल जाहीर झाल्यानंतर ________ दिवसांच्या आत निवडणूक खर्चाचा हिशेब निवडणूक आयोगास सादर करावा लागतो.

(1) 30 दिवसांत (2) 15 दिवसांत (3) 45 दिवसांत (4) 20 दिवसांत

The candidate who contested the election has to submit statement of election expenditure to the Election Commission within ________ days after the official declaration of election results.

(1) 30 days (2) 15 days (3) 45 days (4) 20 days

---

9. मार्गदर्शक तत्वे घटनेत समाविष्ट करण्याचा घटनाकारांचा कोणता उद्देश होता ?

(1) कल्याणकारी राज्याची स्थापना करणे
(2) केंद्र सरकारला मार्गदर्शन करणे
(3) घटकराज्याला मार्गदर्शन करणे
(4) सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे

What was the objective of the constitutionists to include the Directive Principles of State Policy ?

(1) To establish a Welfare State
(2) To guide the Central Government
(3) To guide the States
(4) To establish the social and economic justice

---

10. न्यायव्यवस्थेची रचना, क्षेत्र आणि अधिकार ठरविण्याचे अधिकार खालीलपैकी कोणाला आहेत ?

(1) राष्ट्रपती (2) पंतप्रधान
(3) भारताचे सरन्यायाधीश (4) संसद

Who of the following have the power to determine the structure, jurisdiction and rights of the judiciary ?

(1) President (2) Prime Minister
(3) Chief Justice of India (4) Parliament

---

11. लोकायुक्ताची संस्था प्रथमच कोणत्या राज्याने निर्माण केली ?

(1) महाराष्ट्र (2) पंजाब
(3) बिहार (4) ओडिशा

Which amongst the following States first created the institution of Lokayukta ?

(1) Maharashtra (2) Punjab
(3) Bihar (4) Odisha

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

12. खालीलपैकी कोणता महानगरपालीकेचा राजस्वचा स्रोत नाही ?

(1) महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केट, घरे, प्लाझा इ.चे भाडे

(2) शहरांतील नोंदणीकृत व्यावसायिक वाहनांकडून कर

(3) संबंधित राज्यसरकारांनी दिलेले अनुदान

(4) यापैकी नाही

Which of the following is not a Municipal Corporation's source of revenue ?

(1) Rents from Municipal Corporation – owned markets, houses, plazas etc.

(2) Taxes from commercial vehicles registered in the city

(3) Grants provided by the respective State Governments

(4) None of these

---

13. खालीलपैकी कोणत्या तरतुदीनुसार प्रत्येक पंचायतीमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी आरक्षण आहे ?

(1) भारतीय राज्यघटनेचे कलम 243 (ई)

(2) भारतीय राज्यघटनेचे कलम 243 (व्ही)

(3) भारतीय राज्यघटनेचे कलम 243 (एस)

(4) भारतीय राज्यघटनेचे कलम 243 (डी)

Under which one of the following provisions is the reservation for Scheduled Castes and Scheduled Tribes made in every Panchayat ?

(1) Article 243 (E) of the Constitution of India

(2) Article 243 (V) of the Constitution of India

(3) Article 243 (S) of the Constitution of India

(4) Article 243 (D) of the Constitution of India

**14.** खालीलपैकी कोणत्या मार्गाने एखादी व्यक्ति भारतीय नागरीकत्व प्राप्त करू शकते ?

a. जन्माद्वारे

b. वंशाद्वारे

c. नोंदणीद्वारे

d. विनंतीद्वारे

(1) a, b आणि c (2) a, b आणि d

(3) a, c आणि d (4) सर्व बरोबर आहेत

By which of the following modes a person can acquire citizenship of India ?

a. By birth

b. By descent

c. By registration

d. By request

(1) a, b and c (2) a, b and d

(3) a, c and d (4) All are correct

---

**15.** भारतीय राज्यघटनेच्या 42 व्या घटनादुरुस्तीने 4 थ्या भागातील कलम ________ मध्ये मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

(1) 51 अ (2) 51 ब (3) 51 क (4) 51 ड

Fundamental Duties have been included in Article ________ of $4^{th}$ Section of the Constitution of India by $42^{nd}$ Amendment.

(1) 51 A (2) 51 B (3) 51 C (4) 51 D

---

**16.** आठव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी ________ होता.

(1) 1991-96 (2) 1982-87 (3) 1992-97 (4) 1962-67

The period of VIII Five Year Plan was

(1) 1991-96 (2) 1982-87 (3) 1992-97 (4) 1962-67

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**17.** पहिल्या पंचवार्षिक योजनेत __________ साठी सर्वाधिक वाटप करण्यात आले होते.

(1) जलसिंचन आणि पूर नियंत्रण (2) कुटिर आणि लघुउद्योग

(3) वाहतूक आणि दळणवळण (4) ऊर्जा क्षेत्र

The highest allocation was provided for __________ in First Five Year Plan.

(1) Irrigation and flood control (2) Cottage and small scale industries

(3) Transport and communication (4) Energy sector

---

**18.** भारतातील स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर __________ योजनेत सर्वात कमी होता.

(1) पहिली पंचवार्षिक योजना (2) चौथी पंचवार्षिक योजना

(3) तीसरी पंचवार्षिक योजना (4) पाचवी पंचवार्षिक योजना

The GDP growth rate was lowest during __________ plan in India.

(1) First five year plan (2) Fourth five year plan

(3) Third five year plan (4) Fifth five year plan

---

**19.** पाचव्या पंचवार्षिक योजनेचा प्रमुख उद्देश __________ हा होता.

(1) अवजड उद्योगांची वाढ (2) सामाजिक न्यायासह वाढ

(3) कुटिर उद्योगांची वाढ (4) लघुउद्योगांची वाढ

The main aim of fifth five year plan was

(1) Growth of heavy industries (2) Growth with social justice

(3) Growth of cottage industries (4) Growth of small industries

---

**20.** आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पुढीलपैकी कोणत्या उद्दिष्टांवर भर देण्यात आला ?

अ. रोजगारनिर्मिती

ब. आरोग्य सुविधा

क. लोकसंख्या वृद्धीमध्ये घट

(1) फक्त अ आणि क (2) फक्त अ आणि ब (3) फक्त ब आणि क (4) वरील सर्व

Which of the following objectives were focused in VIII Five Year Plan ?

a. Employment generation

b. Health facilities

c. Reducing population growth

(1) Only a and c (2) Only a and b (3) Only b and c (4) All of the above

**21.** 'पेनिन्स्युलर रॉक अगामा' कशाशी संबंधित आहे ?

(1) सरडा
(2) समुद्री खडकाचा प्रकार
(3) बिन-विषारी साप
(4) एक आदिवासी समाज

To what 'Peninsular Rock Agama' is related ?

(1) Lizard
(2) Type of sea rock
(3) Non-poisonous snake
(4) A tribal community

---

**22.** खालीलपैकी योग्य कथन/ने ओळखा.

अ. जपानने आपल्या काएयो शहरात मिनिबस प्रमाणे दिसणारे जगातील पहिले ड्यूएल-मोड वाहन सादर केले आहे.

ब. ड्यूएल-मोड वाहन रेल्वे ट्रॅकवर 60 किमी/ता. वेगाने धावू शकते आणि सार्वजनिक रस्त्यावर सुमारे 100 किमी/ता. वेगाने जाऊ शकते.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ व ब दोन्ही
(4) वरीलपैकी नाही

Select the correct statement/s from the following.

A. Japan has introduced a minibus lookalike world's first dual-mode vehicle in its town of Kaiyo.

B. The dual-mode vehicle can run at a speed of 60 km/h on rail tracks and can go as fast as around 100 km/h on public roads.

(1) Only A
(2) Only B
(3) Both A and B
(4) None of the above

---

**23.** भारतातून आशिया पैसिफिक फोरम (APF) च्या गव्हर्नन्स कमिटीचे सदस्य म्हणून कोणाची निवड झाली आहे ?

(1) न्यायमूर्ती रंजन गोगोई
(2) न्यायमूर्ती सदाशिवन
(3) न्यायमूर्ती अरुण कुमार मिश्रा
(4) न्यायमूर्ती एन.व्ही. रमणा

Who has been elected as a member of the Governance Committee of the Asia Pacific Forum (APF) from India ?

(1) Justice Ranjan Gogoi
(2) Justice Sadasivan
(3) Justice Arun Kumar Mishra
(4) Justice N.V. Ramana

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**24.** ब्रिटनच्या पंतप्रधानपदी लिझ ट्रस यांची निवड झाली. खालील विधानांपैकी कोणते विधान/विधाने त्यांच्या संदर्भात चुकीचे आहे/त ?

a. त्या हुजूर पक्षाचे प्रतिनिधीत्व करतात.

b. त्या ब्रिटनच्या दुसऱ्या महिला पंतप्रधान आहेत.

c. भारतीय वंशाच्या ऋषि सुनक यांचा त्यांनी पराभव केला.

(1) फक्त a आणि b (2) फक्त b आणि c

(3) फक्त a (4) फक्त b

Liz Truss was elected as the Prime Minister of Britain. Which of the following statements is/are incorrect about her ?

a. She represents conservative party.

b. She is the second female Prime Minister of Britain.

c. She defeated Rishi Sunak who is of Indian origin.

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a (4) Only b

---

**25.** iNCOVACC, ज्याला कोविडसाठी इंट्रानासल बूस्टर डोस म्हणून मान्यता देण्यात आली होती, ती कोणत्या संस्थेद्वारे उत्पादित केली जाते ?

(1) सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (2) बायोलॉजिकल ई लिमिटेड

(3) भारत बायोटेक (4) बायोकॉन

iNCOVACC, which was approved as an intranasal booster dose for COVID, is manufactured by which institution ?

(1) Serum Institute of India (2) Biological E Ltd.

(3) Bharat BioTech (4) Biocon

---

**26.** 2022 च्या राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये भारतासाठी पहिले सुवर्णपदक खालीलपैकी कोणी जिंकले ?

(1) निखत झरीन (2) मीराबाई चानू

(3) अचिंता शेऊली (4) साक्षी मलिक

Who won the first gold medal for India in Commonwealth Games, 2022 ?

(1) Nikhat Zareen (2) Meerabai Chanu

(3) Achinta Sheuli (4) Sakshi Malik

---

**27.** भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ अर्थात सेबीच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा मान कोणास मिळाला आहे ?

(1) अरुंधती भट्टाचार्य (2) शिखा शर्मा
(3) माधवी पुरी बुच (4) शांती एकांबरम

Who is the first Woman Chairperson of the Securities and Exchange Board of India (SEBI) ?

(1) Arundhati Bhattacharya (2) Shikha Sharma
(3) Madhavi Puri Buch (4) Shanti Ekambaram

---

**28.** श्रीहरिकोटाहून पी.एस.एल.व्ही. – सी54 रॉकेट कोणी प्रक्षेपित केले ?

(1) नासा (2) इस्रो (3) डी.आर.डी.ओ. (4) बी.ए.आर.सी.

Who among the following launched the PSLV – C54 rocket from Sriharikota ?

(1) NASA (2) ISRO (3) DRDO (4) BARC

---

**29.** यू.एन. जैवविविधता परिषद COP 15 (2022) चे यजमान देश कोणता आहे ?

(1) चीन (2) स्वीडन (3) कॅनडा (4) ऑस्ट्रेलिया

Which country is the host of the UN Biodiversity Conference COP 15 (2022) ?

(1) China (2) Sweden (3) Canada (4) Australia

---

**30.** योग्य विधान/ने ओळखा.

अ. शेख हमदान बिन मोहम्मद यांनी 100% पेपर विरहित करणारे दुबई हे जगातील पहिले सरकार ठरले आहे, अशी घोषणा केली.

ब. डिजिटलायझेशनमुळे ग्राहकांना सर्व सरकारी सेवा उपलब्ध होतील आणि दुबई मध्ये 336 मिलीयन पेक्षा जास्त कागदाचा वापर कमी होईल.

(1) फक्त अ योग्य आहे.
(2) फक्त ब योग्य आहे.
(3) विधान अ व ब दोन्ही योग्य आहेत.
(4) विधान अ व ब दोन्ही अयोग्य आहेत.

Select the correct statement/s.

A. Sheikh Hamdan bin Mohammad announced that Dubai became the world's first government to turn 100% paperless.

B. The digitalization will provide all Govt. services to customers and reduce paper consumption by more than 336 million papers in Dubai.

(1) Only A is correct.
(2) Only B is correct.
(3) Both the statements A and B are correct.
(4) Both the statements A and B are incorrect.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**31.** पुढील आकृतीच्या रकान्यात क्रमश: 6 ते 14 या संख्यांची अशी मांडणी करा की, रकान्यांची उभी, आडवी, तिरकस बेरीज समान येते, तर कोपऱ्यातील रकान्यात कोणत्या संख्या येतील ?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |

(1) 4, 6, 10, 8
(2) 7, 9, 13, 11
(3) 6, 8, 14, 12
(4) 7, 12, 6, 8

Filled the numbers from 6 to 14 sequentially in the columns of the following figure in such a way that their vertical, horizontal, diagonal sums are equal, then what will be the numbers in columns at corners ?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |

(1) 4, 6, 10, 8
(2) 7, 9, 13, 11
(3) 6, 8, 14, 12
(4) 7, 12, 6, 8

---

**32.** वडील हे आईपेक्षा 6 वर्षांनी मोठे आहेत व आईचे आजचे वय मुलीच्या वयाच्या तिप्पट आहे. मुलीचे आजचे वय 12 वर्षे आहे, तर मुलीच्या जन्मावेळी वडीलांचे वय काय होते ?

(1) 30 वर्षे
(2) 32 वर्षे
(3) 42 वर्षे
(4) 36 वर्षे

Father is 6 years older to mother and mother's today's age is thrice the age of the daughter. The daughter is now 12 years old, what was the father's age when the daughter was born ?

(1) 30 yrs.
(2) 32 yrs.
(3) 42 yrs.
(4) 36 yrs.

**33.** खालील माहिती काळजीपूर्वक अभ्यासा आणि दिलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या :

बीना, मीना, टीना, रीना, करीना, हीना आणि डायना या रेल्वेने 'तीन स्तरीय शयनासनाच्या' डब्यात प्रवास करीत आहेत. यापैकी प्रत्येक जण अभियंता, डॉक्टर, वास्तुविद्याविशारद, औषध निर्माता, वकील, पत्रकार आणि रोगचिकित्सातज्ज्ञ असे विविध व्यावसायिक आहेत. त्यांची 'सर्वात खालील दोन शयनासने', 'मधली तीन शयनासने' आणि 'सर्वात वरील दोन शयनासने' अशी शयनासने आहेत. बीना ही अभियंता 'वरील शयनासनावर' नाही. वास्तुविद्याविशारद ही अशी व्यक्ती आहे की, जिच्या शयनासनाचा प्रकार हा बीनाच्या शयनासनासारखाच आहे. मीना आणि हीना या 'मधील शयनासनावर' नसून त्यांचे व्यवसाय अनुक्रमे रोगचिकित्सातज्ज्ञ व वकील असे आहेत. टीना ही औषधनिर्माती आहे. डायना पत्रकार नाही आणि वास्तुविद्याविशारदही नाही. करीनाच्या शयनासनाचा प्रकार हा डॉक्टरच्या शयनासनासारखाच आहे, तर खालीलपैकी कोणत्या समूहाची शयनासने मधली आहेत ?

(1) डायना – करीना – टीना

(2) हीना – करीना – टीना

(3) डायना – करीना – रीना

(4) डायना – हीना – टीना

Study the following information carefully and answer the given question :

Beena, Meena, Teena, Reena, Karina, Heena and Daina are travelling in a train compartment with 'III- tier sleeper berth'. Each of them has different profession of engineer, doctor, architect, pharmacist, lawyer, journalist and pathologist. They occupied 'two lower berths', 'three middle berths' and 'two upper berths'. Beena, the engineer is not on the 'upper berth'. The architect is the only person who occupies the same type of berth as that of Beena. Meena and Heena are not on the 'middle berth' and their professions are pathologist and lawyer respectively. Teena is pharmacist. Daina is neither a journalist nor a architect. Karina occupies the same type of berth as that of doctor, then which of the following groups occupies the middle berth ?

(1) Daina – Karina – Teena

(2) Heena – Karina – Teena

(3) Daina – Karina – Reena

(4) Daina – Heena – Teena

**34.** ज्यांच्यापैकी एक अपराधी आहे अशा चार संशयितांची पोलीसांकडून कसून चौकशी चालू आहे. जर फक्त एकच विधान सत्य असेल तर अपराधी निवडा.

अनी : ते दादूने केले.

चानी : ईनी निरपराध आहे.

दादू : अनी माझ्यावर आरोप करत खोटं बोलतेय.

ईनी : चानी खरं बोलतेय.

(1) ईनी (2) दादू (3) अनी (4) चानी

Four suspects, one of whom is the guilty party, are beirıg interrogated by the police. Select the culprit if just only one of the statements is true.

Ani : Dadu did it.

Chani : Eni is innocent.

Dadu : Ani is lying when she accuses me.

Eni : Chani is telling the truth.

(1) Eni (2) Dadu (3) Ani (4) Chani

---

**35.** पुढील प्रश्नाचे उत्तर देण्याच्या संदर्भात सर्वात योग्य पर्याय निवडा :

तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती ?

a. वर्गातील पुरुष विद्यार्थ्यांची संख्या स्त्री विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दुप्पट आहे.

b. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या वयाची एकूण बेरीज 323 आहे आणि त्यांचे सरासरी वय 17 आहे.

(1) माहिती "a" व "b" एकत्रितपणे पुरेशी नाही.

(2) माहिती "a" व "b" एकत्रितपणे गरजेची आहे पण पुरेशी नाही.

(3) फक्त माहिती "a" पुरेशी आहे तर फक्त माहिती "b" पुरेशी नाही.

(4) फक्त माहिती "b" पुरेशी आहे तर फक्त माहिती "a" पुरेशी नाही.

Select the most appropriate option with respect to answer the following question :
What is the total number of pupils in your class ?

a. The number of male students in the class is twice as much as the number of female students in the class.

b. The sum of ages of all the pupils in class is 323 and their average age is 17.

(1) Information "a" and "b" together are not sufficient.

(2) Information "a" and "b" together is necessary but not sufficient.

(3) Information "a" alone is sufficient while information "b" alone is not sufficient.

(4) Information "b" alone is sufficient while information "a" alone is not sufficient.

**36.** एका सांकेतिक भाषेनुसार,

1 2 4 म्हणजे fresh and juicy

5 4 6 म्हणजे eat juicy fruits

6 7 8 म्हणजे fruit is ripe

तर 'eat' या शब्दाशी निगडित चिह्न कोणते ?

(1) 4 (2) 6 (3) 5 (4) 7

As per a code language,

1 2 4 means fresh and juicy

5 4 6 means eat juicy fruits

6 7 8 means fruit is ripe

Then what is the sign associated with 'eat' ?

(1) 4 (2) 6 (3) 5 (4) 7

---

**37.** एका सांकेतिक भाषेत APTITUDE हा शब्द ELXEXQHA असा लिहितात, तर त्याच सांकेतिक भाषेत ELEPHANT हा शब्द कसा लिहाल ?

(1) IHILLWRP (2) IHINNWRP (3) IOILLWRP (4) IHITLWRP

The word APTITUDE is written as ELXEXQHA in a code language, how the word ELEPHANT will be written in the same code language ?

(1) IHILLWRP (2) IHINNWRP (3) IOILLWRP (4) IHITLWRP

---

**38.** पुढील प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात तार्किक दृष्ट्या उचित पर्याय निवडा :

M चे N शी नाते काय ?

a. R ची बहीण J हिने M चा भाऊ L याच्याशी लग्न केलेले आहे, जो स्वत:च्या आई-वडिलांचा एकटा मुलगा आहे.

b. N ही L आणि J यांची एकटी मुलगी आहे.

(1) सामग्री a गरजेची आहे परंतु फक्त तेवढीच पुरेशी नाही.

(2) सामग्री b गरजेची आहे परंतु फक्त तेवढीच पुरेशी नाही.

(3) सामग्री a व b एकत्रितपणे गरजेची आणि पुरेशी आहे.

(4) सामग्री a व b एकत्रितपणे गरजेची आहे पण अपुरी आहेत.

Select the logically appropriate option with respect to answer the following question :

How is M related to N ?

a. R's sister J has married M's brother L, who is the only son of his parents.

b. N is the only daughter of L and J.

(1) Data a is needed but not sufficient alone.

(2) Data b is needed but not sufficient alone.

(3) Data a and b together are needed and sufficient.

(4) Data a and b together are needed but they are insufficient.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**39.** आशियातील गरीब देशांत मुलांचा स्वस्त मजूर म्हणून इलेक्ट्रॉनिक्स, तयार कपडे, पादत्राणे, आणि खेळणे निर्मिती उद्योगातील वापराला प्रतिबंध करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. यावर बंदी आणण्याखेरीज अन्य काहीही करणे मान्य होण्यासारखे नाही. मालकांना बालश्रमिक ही आकर्षक योजना वाटते कारण मुलांची बोटे चटपट हलतात, त्यांची दृष्टी उत्तम असते, अनेकदा ती प्रौढांपेक्षा अधिक उत्पादन करतात आणि त्यांना जास्त पगार देण्याची गरज नसते. त्यांचा पुरवठा तयारच असतो आणि याबद्दल शिक्षणातून होणाऱ्या मुलांच्या गळतीचे आभार मानायला हवेत कारण त्यांच्या पालकांना त्यांना शिकवणे परवडत नाही. जर मुलांनी काम करणे भाग असेल तर त्यांना बाल्यापासून आणि शिक्षणापासून वंचित ठेवले जाते.

पुढील पर्यायांपैकी सत्य असणारा आणि वरील युक्तिवाद सर्वात जास्त दुबळा करणारा पर्याय निवडा.

(1) फार पूर्वीपासून आंतरराष्ट्रीय संस्था सर्वांना शिक्षण नि:शुल्क करण्यासाठी दबाव आणत आहेत.

(2) नोकरीसाठी वयाच्या किमान मर्यादेचे पालन करण्याचे कायदे सर्वत्र अस्तित्वात नाहीत.

(3) प्रौढांपेक्षा मुले अधिक सातत्याने काम करतात हे सर्वश्रुत आहे.

(4) तसेही कुटुंबाला मुलांच्या रोजीशिवाय त्यांना शिक्षण देणे परवडणारे नाही.

Legal action should be taken to prevent the use of children as low cost labour in poor Asian countries in industries such as electronics, garments, shoe, and toy manufacturers. Nothing short of a ban on child labour is acceptable. Child labour is an attractive proposition for employers because children have quick fingers, good eye sights and are often more productive than adults and do not have to be paid very much. And there is a ready supply, thanks to the number of children dropping out of education because their parents cannot afford to educate them. If children have to work they are denied their childhood and education.

Select one of the following options that is true and most weakens the above arguments.

(1) International agencies have long been pressing for free education for all.

(2) Laws governing the minimum age for employment do not exist everywhere.

(3) It is well known that children work more consistently than adults.

(4) Without the children's wages, the family could not afford to educate them anyway.

40. जेव्हा व्यक्ती अन्य देशात जाते तेव्हा त्याने किंवा तिने अल्पावधीत भाषा आत्मसात करणे कठीण असले तरीही किमान त्या देशाची भाषा थोड्या प्रमाणात शिकायला हवी. देशाची भाषा थोड्या प्रमाणात आत्मसात झाली तरी ती तुम्हाला त्या देशासंबंधी व तेथील लोकांच्या चालीरीतीविषयी अधिक माहिती मिळवायला मदत करते. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टीकडे अंगुलीनिर्देश करून वा हातवारे करण्याऐवजी माहिती, पत्ता विचारणे, दुकानात किंवा विश्रांतीगृहात स्वत:ला काय हवे ते मागवणे इत्यादी गोष्टी तुम्ही अधिक सोपेपणाने करू शकता हे निश्चितच कमी पेचात टाकणारे आहे असाही त्याचा अर्थ होतो.

वरील युक्तिवादाचा प्रमुख निष्कर्ष ठरेल अशी सर्वात उचित अभिव्यक्ती पुढील पर्यायांतून निवडा.

(1) परदेशाला भेट देणाऱ्या व्यक्तींनी परदेशी भाषेचा थोडा परिचय करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(2) जर देशाच्या भाषेशी तुम्ही परिचित असाल तर त्या देशात जीवन जगणे तुम्हाला सोपे जाते.

(3) जर तुमचा देशाच्या भाषेशी परिचय असेल तर त्याबद्दल अधिक माहिती मिळवणे तुम्हाला शक्य होते.

(4) संप्रेषणासाठी खुणांची भाषा वापरण्यापेक्षा परदेशी भाषा बोलणे सोपे आहे.

When persons go to other country, he or she should try to learn at least some of the language of that country, though it is difficult to pick up unfamiliar language in a short time. Learning just a little about a country's language helps you to find out more about itself and its people's customs. Similarly it means that you can do things more easily by being able to ask for information, addresses, order what you want at a shop or restaurant that is less embracing than pointing and arm waving.

Select from the following options most appropriate expression as main conclusion of above argument.

(1) Persons visiting foreign country should try to get some acquaintance with its language.

(2) If you are familiar with language of the country it is easier for you to lead a life in that country.

(3) It is possible to find out more about the country if you are familiar with its language.

(4) Speaking foreign language is easier than using sign language for communication.

**41.** सोबतच्या आकृतीत रेख BA || किरण CE, तर ∠ACB चे माप किती ?




(1) 60° (2) 80° (3) 70° (4) 45°

In following figure, seg BA || ray CE, then m ∠ACB = ?




(1) 60° (2) 80° (3) 70° (4) 45°

---

**42.** शाळेतील 768 विद्यार्थ्यांना रांगेत उभे राहण्यास सांगितले. प्रत्येक रांगेत जेवढे विद्यार्थी आहेत त्याच्या $\frac{1}{3}$ रांगांची संख्या आहे, तर प्रत्येक रांगेत किती विद्यार्थी आहेत ?

(1) 32 (2) 48 (3) 27 (4) 54

In the school, 768 students were told to stand in rows. The number of rows are $\frac{1}{3}$ the number of students in each row. Then how many students are in each row ?

(1) 32 (2) 48 (3) 27 (4) 54

---

**43.** यश उत्तरेकडे 5 किमी चालत गेला, नंतर उजवीकडे वळून 8 किमी गेला, पुन्हा उजवीकडे वळून 3 किमी गेला आणि पुन्हा उजवीकडे 5 किमी जाऊन डावीकडे वळून 2 किमी गेल्यास, यश सुरुवातीच्या ठिकाणापासून किती अंतरावर आहे ?

(1) 23 किमी (2) 19 किमी (3) 21 किमी (4) 3 किमी

Yash travels to the North 5 km, turns right and travel 8 km and then turns right and cover 3 km and then again turns right travel another 5 km and then turns left and travel 2 km. How far is Yash from the starting point ?

